दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १८२
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, बुधवार, दि.१२ फेब्रुवारी २०२५

थोडक्यात

परीक्षेच्या पूर्वसंध्येला बारावीच्या विद्यार्थ्याची आत्महत्या

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.११, सांगली : बारावी परीक्षा सुरू होण्याच्या पूर्व संध्येला मिरजेतील भारतनगरमध्ये एका बारावीच्या विद्यार्थ्यांने आत्महत्या करण्याचा प्रकार समोर आला आहे. याबाबत महात्मा गांधी चौक पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यू अशी नोंद करण्यात आली.

भारतनगरमधील गवळी प्लॉटमध्ये वास्तव्य असलेल्या प्रथमेश बाळासाहेब बिराजदार असे या विद्यार्थ्याचे नाव असून तो खासगी अकादमीमध्ये बारावीचे शिक्षण घेत होता. सोमवारी रात्री परीक्षेची पूर्व तयारी कशी करायची, पेपर कसा सोडवायचा याबाबतचे अकादमीमध्ये मार्गदर्शन घेउन घरी आला होता. रात्री बहिणीशी नेहमीप्रमाणे चर्चा करून तो वरच्या मजल्यावर गेला. रात्री नउ वाजणेच्या सुमारास त्याला जेवणासाठी बोलावण्यास वरच्या मजल्यावर गेल्यानंतर त्यांने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना समोर आली. बारावी परीक्षेच्या तणावातून त्यांने आत्महत्या केली की अन्य कारण आहे हे मात्र अद्याप समजलेले नाही.

अभ्यासाच्या ताणातून विद्यार्थ्याचा आत्महत्येचा प्रयत्न

अक्षराज : प्रतिनिधी

दि.११, पनवेल : अभ्यासाच्या ताणामुळे एका विद्यार्थ्याने दुचाकी घेऊन पनवेल शीव महामार्गावर विरुद्ध दिशेने दुचाकी चालवून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. ही घटना सोमवारी रात्री सव्वासात वाजता रोडपाली येथील पुरुषार्थ उड्डाणपुलावर घडली. सुदैवाने या अपघातामध्ये संबंधित विद्यार्थी बचावला आहे. मात्र त्याची प्रकृती अजूनही अत्यवस्थ आहे. त्याच्यावर नजीकच्या कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या अपघाताबाबत कामोठे पोलीस ठाण्यात रितसर सोमवारी रात्री गुन्हा नोंदविण्यात आला आहे. संबंधित विद्यार्थी हा दुचाकीने आत्महत्या करण्याच्या उद्देशाने शीव पनवेल महामार्गावर विरुद्ध दिशेने प्रवास करत होता. संबंधित व्हॅगनर मोटारीचे आणि दुचाकीचे सुद्धा या अपघातामध्ये मोठे नूकसान झाले. रोडपाली उड्डाणपुलावर मुंबईच्या दिशेने जाण्याच्या मार्गिकेवर विद्यार्थ्याने दुचाकी चढविली. रात्रीच्यावेळी या उड्डाणपुलावर मुंबईच्या दिशेने भरधाव वेगाने वाहन धावतात. त्याच वाहनांच्या गर्दीत हा अपघात घडला. व्हॅगनर मोटारीला ठोकल्यानंतर जखमी दुचाकीस्वाराची चौकशी केल्यावर जखमी मुलाने 'माझी तब्येत बरी नाही, माझा अभ्यास होत नाही. मला आत्महत्या करायची', अशी व्यथा ऐकल्यानंतर जमलेल्या प्रवाशांनी तातडीने पोलीसांना बोलावले. कामोठे पोलीस सुद्धा काही मिनिटांतच तेथे पोहचले. पोलीसांनी इतर जमलेल्यांनी व्यक्तींच्या मदतीने जखमी विद्यार्थ्याला रुग्णालयात दाखल केले. या दरम्यान पोलीसांनी विद्यार्थ्याच्या पालकांना संपर्क साधला. रात्री उशीरापर्यंत हा विद्यार्थी बेशुद्ध अवस्थेमध्ये होता. या संवेदनशील घटनेचा तपास कामोठे पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरिक्षक प्रियंका खरटमल या करीत आहेत. पोलीस अधिकारी खरटमल या संबंधित विद्यार्थ्याने असे का केले असावे, याचा शोध घेत आहेत.

बुलडाण्यात ऐतिहासिक ठेवा !

घराचे बांधकाम करताना आढळले प्राचीन भुयार

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.१०, मुंबई : स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ माँसाहेब यांचे माहेर असलेला जिल्हा म्हणजे बुलढाणा. जिल्ह्यात मुगल, निजामशाही, आदिलशाही काळातील ऐतिहासिक खानाखुणा विस्तीर्ण पट्ट्यात ठिकठिकाणी आढळून येतात. याच बुलढाणा जिल्ह्यात ऐतिहासिक भुयार आढळून आले आहे.

आधुनिक पद्धतीने बांधण्यात येणाऱ्या एका मोठ्या घराच्या बांधकाम दरम्यान हे भुयार आढळून आले आहे. बुलढाणा तालुक्यातील साखळी बुद्रुक येथे हे ऐतिहासिक आणि अजूनही सुव्यवस्थित असलेले भुयार आढळले आहे.

घराचे खोदकाम करताना आढळून आलेले हे मोठे भुयार पाहण्यासाठी साखळी बुद्रुक मध्ये अगोदर हजारो





गावकऱ्यांची गर्दी जमली. नंतर पंचक्रोशीतील हजारो गावकरी मिळेल त्या वाहनाने साखळी मध्ये दाखल झाले. यानंतर जवळच्या बुलढाणा, चिखली तालुक्यातील नागरिकांची तोबा गर्दी उसळली आहे. बुलढाणा शहराला लागूनच असलेल्या साखळी बुद्रुक या गावात इतिहासाची साक्ष देणार भुयारघर सापडलं, ही बातमी 'सोशल मीडिया'मुळे वेगाने पसरली.

पुरातत्व चा पूढाकार आवश्यक

साखळी बुद्रुक येथील रवींद्र आप्पा साखळीकर यांनी घराच्या बांधकामासाठी पाया खोदणे नुकतेच सुरू केले आहे. हे खोदकाम सुरु असताना खोदकाम करणाऱ्या म जुरांना एक मोठा माठ लागला, माठ बाजूला केल्यानंतर खाली चक्क मोठं भुयार दिसून आले, खोदता खोदता ते भुयार एवढ मोठं होत गेलं की बांधकाम करणारे मजूर, गवंडी, घरमालक साखळीकर आणि समस्त गावकरी थक्क झाले.

हा भुयारी रस्ता कुठे जात आहे याचा शोध लागला नसून ते सर्वसाम ान्य जनतेसाठी अशक्यच आहे. यामुळे पुरातत्व विभागाने प्रत्यक्षात भेट देऊन पाहणी करावी व खोदकाम करावे अशी मागणी ग्रामस्थाकडून होत आहे.

भुयारचा काळ कोणता?

बुलढाणा जिल्ह्याच्या सिंदखेड राजा नगरीत शिवकालीन पराक्रमी जाधव घराण्याच्या इमारती, जिजाऊचे जन्मस्थान असलेला राजे लखुजी जाधव यांचा राजवाडा, त्यांचे समाधी स्थळ, रामेश्वर मंदिर, चांदणी तलाव, बारव हे जाधव घराण्याच्या वैभवाचे साक्षीदार आहे. त्याशिवाय बुलढाणा नजीकच्या देऊळघाट येथे मुगल कालीन गढी, तटबंदीचे अवशेष आहेत. साखरखेर्डा (ता. सिंदखेड राजा) येथे, रोहिनखेड (ता. मोताळा) येथे निजामशाही, आदिलशाही कालीन अवशेष, पूरातन विशिष्ट बांधकामच्या मशीद, मलकापूर येथे मुगल कालीन प्रवेशद्वार असे अनेक अवशेष आहेत. यामुळे साखळी बुद्रुक येथे आढळून आलेले भुयार कोणत्या काळातील आहे याबद्धल इतिहास, संस्कृती प्रेमीमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. पुरातत्व विभागाने यासाठी तातडीने कार्यवाही करणे गरजेचे आहे.

मनीमॅक्स कंपनी बंद पडल्याने कोट्यावधी रुपयाला चुना!

अक्षराज : राजकुमार इकडे

दि.११, सुपा (अ.नगर) : पारनेर तालुक्यातील सुपा हे अत्यंत गजबजलेले, शहराचा दर्जा असलेल्या ठिकाणी मनी मॅक्स या बनावट कंपनीचे आफीस होते. भरपुर व्याज दर असेलेली ही बनावट कंपनी मधे सुपा पंचक्रोशीतील सर्व सामान्य माणसापासुन तर व्यापारी, कारखानदार, शेतकरी, राजकीय पुढारी अशा लोकांनी कोट्यावधी रुपयाच्या ठेवी ठेवल्या सुरुवातीला ह्या बनावट कंपनीने लोकांना गुंतवनुक करण्याच्या लालशेपाई भरपुर व्याज दिले.

परतु काही महीण्यातच ही कंपनी बंद पडली म्हणुन घोशीत करण्यात आले. ठेवीदाराचे तोडांचे पाणीच पळाले, ही वस्तुस्थिती आज पहावयास मिळते. गेल्या सप्ताहात अशीच एक बनावट कंपनी अस्टरही करोडो रुपयाला चुना लावुन बंद पडली. व्याजाच्या हव्यासा पोटी गुंतवनुक दार देशोधडीस लागले. त्यामधे सर्वसामान्य लोकांची गुंतवनुक जास्त होते. असे बोलले जात आहे.

आज ही सुपा पंचक्रोशीत सिस्पे, ही एक कंपनी आपले स्व;ताचे आफीस टाकुन बाजारात खुलेआम आहे. सिस्पे कंपनी मधे ही सुपा पंचक्रोशील अनेक गावाची गुंतवनुक केलेली आहे. सिस्पे ही कंपनी

ही बनावट का? असु नये! सदर कंपनी मधे ७० ते ८० कोटी गुंतवनुक आसल्याचे बोलले जात आहे, तरी समाजाने सावध होउन राष्ट्रीय बँका सोडुन कुठेही गुंतवनुक करु नये,

मनीमॅक्स, अस्टर, सिस्पे अशा बनावट कंपन्यांच्या नादी लागु नये, अशा कंपन्या कधीही बंद पडु शकतात. सदर कंपन्या ह्या पांढरपेशातील काळा बाजार करीत आहे तरी सरकार अशा बनावट कंपन्यावर काहीच कार्यवाही का?करीत नाही, ही खेदाची बाब आहे. अशा पांढरपेशातील अनेक कंपन्या बाजारात आहेत. भरपुर व्याजदर मिळतो म्हणुन जनता अशा बनावट कंपन्याच्या भुलथापांना बळी पडुन, समाज आज देशोधडीला लागला आहे,तरी सरकार काहीच करु शकत नाही.

तरी अशा बनावट कंपन्यापासुन सावध राहण्याचा वेळोवेळी पारनेर तालुका माहीती सेवा समितीच्या वतीने, पत्रकार राजकुमार इकडे यांनी दिला आहे. अशा बनावट कंपन्या बाजारात आल्या आणी बंद ही पडल्या. त्यामधे अनेकांचे संसार उध्वस्त झाले, तर काही आत्महात्या करण्याच्या मार्गावर आहेत. सदर कंपन्याच्या पाठीमागे काहीतरी राजकीय षढयंत्र असले पाहीजे असे समाजाकडुन बोलले जात आहे, तरी सर्व गुंतवनुक धारकांना अहवान करण्यात येते की अशा बनावटी कंपन्यापासुन सावधान राहावे,

तरी हयात असलेली सिस्पे कंपनीही बंद पडु शकते असा इशारा ही पत्रकार राजकुमार इकडे यांनी दिला आहे.

ऐन महापालिका निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेसला मोठा धक्का

अक्षराज : प्रतिनिधी

दि.११, नाशिक : आगामी म हापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांनी जोरदार तयारी सुरु केली आहे. काँग्रेसनेही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. मात्र, असं असतानाच ऐन महापालिका निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेसला नाशिकमध्ये एक मोठा धक्का बसला आहे. काँग्रेसच्या प्रदेश प्रवक्त्या डॉ.हेमलता पाटील यांनी काँग्रेस पक्ष सोडला आहे. गेल्या काही दिवसांपासून त्या काँग्रेसवर नाराज असल्याचं बोललं जात आहे.

काही दिवसांपूर्वी डॉ.हेमलता पाटील यांनी पक्षावर नाराजी देखील व्यक्त केली होती. दरम्यान, हेमलता पाटील यांनी आज (११ फेब्रुवारी) शिवसेना (शिंदे) पक्षात प्रवेश केला आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत त्यांचा पक्षप्रवेश पार पडला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून त्या काँग्रेस पक्षात होत्या. तसेच नाशिक महापालिकेत त्यांनी नगरसेविका म्हणून काम केलेलं आहे. तसेच प्रदेशाचं प्रवक्ते म्हणूनही त्यांनी काँग्रेसमध्ये काम केलेलं आहे.

डॉ. हेमलता पाटील व रंजना बोराडे यांचा शिवसेनेत प्रवेश

हेमलता पाटील काय म्हणाल्या?

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून मी कोणत्याही पदासंदर्भात आश्वासन घेतलेलं नाही. पण एकनाथ शिंदे हे सतत कार्यकर्त्यांचे प्रश्न सोडवणारे व्यक्ती आहेत. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वात आपण देखील काम केलं पाहिजे असं वाटलं. त्यामुळे आज हा निर्णय घेतला. आज त्यांनी शिवसेनेत प्रवेश दिला आहे. आता या पुढे शिवसेनेसाठी एकनिष्ठ काम करणार आहे. आज आम्ही एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा करण्यासाठी आलो होतो. पण लगेच पक्ष प्रवेश झाला आहे. १४ तारखेला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे नाशिकच्या दौऱ्यावर येणार आहेत. तेव्हा अनेक जणांचा शिवसेनेत प्रवेश होईल, असं हेमलता पाटील यांनी माध्यमांशी बोलताना म्हटलं आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे काय म्हणाले?

मुंबई, ठाणे आणि महाराष्ट्रात जिकडे जातो तिकडे अनेकांच्या प्रवेशाचं सत्र सुरु आहे. आता मी दिल्लीत कार्यक्रम ासाठी आलो. मात्र, दिल्लीत देखील पक्ष प्रवेश पडले. त्यामुळे आता तुम्हीच समजून घ्या की पक्षात इनकमिंग सुरु आहे. अनेक कार्यकर्ते शिवसेनेत प्रवेश करत आहेत.

तसेच अनेक राज्यात शिवसेना वाढत आहे. आम्ही गेल्या अडीच वर्षांच्या काळात जे काही काम केलं त्या कामावर विश्वास ठेवून अनेकजण पक्षात प्रवेश करत आहेत, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माध्यमांशी बोलताना म्हटलं आहे.

धुळे पशु बाजारात दोन लाख ६० हजार रुपयांची म्हैस

अक्षराज : प्रतिनिधी

दि.११, धुळे : जिल्ह्यातील शिरपूर कृषी बाजार समितीत खंडेराव यात्रेनिमित्त भरलेल्या पशु बाजारात जुनागढ (गुजरात) येथील गीर जाफर जातीची म्हैस विक्रीसाठी येताच

एका शेतकऱ्याने ती दोन लाख ६० हजार रुपयांना खरेदी केली. ही म्हैस सलग १५ ते १६ महिने रोज २५ लिटर दूध देते, असा दावा संबंधित व्यापाऱ्याने केल्याने म्हैस पाहण्यासाठी शेतकरी, पशु पालकांनी मोठी गर्दी केली.

शिरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीत जनावरांचा मोठा बाजार भरतो. राजस्थान,गुजरात या दोन राज्यांशिवाय देशातील अन्य राज्यांतूनही येथे दुभत्या जनावरांसह बैल, रेडे (हेला) विक्रीसाठी आणली जातात. यामुळे जनावरे खरेदी-विक्रीतून १५ दिवसांत कोट्यावधी रुपयांची उलाढाल होते. या बाजारात हलक्या आणि भारी अशा दोन्ही पद्धतीच्या जनावरांची उपलब्धी होत असल्याने पंचक्रोशीतील खरेदीदार या बाजारात मोठ्या संख्येने हजेरी लावतात.

शिरपूर कृषी बाजार समितीत एक म्हैस गुजरात राज्यातील जुनागढ येथून अरुण बडगुजर या व्यापाऱ्याने विक्रीसाठी आणली. गीर जाफर जातीच्या या म्हशीची किंमत दोन लाख ६० हजार रुपये असल्याचे बडगुजर यांनी सांगताच बाजार समितीत आलेल्या शेतकरी, पशुपालकांनी म्हैस पाहण्यासाठी गर्दी केली. म्हशीच्या वैशिष्ट्यांविषयी बडगुजर यांनी माहिती दिली. ही म्हैस सलग १५ ते १६ महिने रोज २५ लिटर दूध देत असल्याची माहिती मिळाल्यावर अर्थे (ता.शिरपूर, धुळे) येथील शेतकरी धनराज साळुंके यांनी खरेदी केली. ही म्हैस खरेदी करणाऱ्या साळुंके यांच्याकडे जवळपास ७० म्हशी आहेत. त्यांना गीर जाफर जातीची म्हैस हवी होती. या जातीची म्हैस दिसताच आणि ती अन्य म्हशींच्या तुलनेत दीर्घकाळ अधिक दूध देणार असल्याने त्यांनी लगेच ती खरेदी केली.

संपादकीय

उत्क्रांती वादाचा जनक

उत्क्रांती वादाचा जनक असे ज्यांना समजले जाते त्या चार्ल्स रॉबर्ट डार्विन यांचा आज जन्मदिन. चार्ल्स डार्विन हे विख्यात जीवशास्त्रज्ञ होते. त्यांनी मांडलेल्या उत्क्रांतीवादाच्या सिद्धांतात जगातील जीवसृष्टीची उत्पत्ती व विकासाची कशी प्रगती होत गेली हे शास्त्रशुद्धरित्या उलगडून दाखवले. चार्ल्स डार्विन यांचा जन्म १२ फेब्रुवारी १८०९ रोजी इंग्लंडमधील शॉपशायर परगण्यात झाला.त्यांचे वडील रॉबर्ट डॉक्टर तर आजोबा इमर्सन शास्त्रज्ञ होते. शालेय जीवनात त्यांना रसायन शास्त्राची खूप आवड होती म्हणून आपल्या भावाच्या मदतीने त्यांनी आपल्या घराबाहेर एक छोटीशी प्रयोगशाळा उभारली होती तिथे ते तासनतास प्रयोग करीत बसत. ते असे एकाच जागेवर तासनतास प्रयोग करीत बसत असल्याने मित्र मंडळी त्यांची नेहमी टर उडवत पण ते त्याकडे कायम दुर्लक्ष करीत. त्यांना निसर्गाचीही खूप आवड होती. पुढे त्यांची डॉ ग्रांट यांच्याशी ओळख झाली. डॉ ग्रांट हे स्वतः प्रसिद्ध जीव शास्त्रज्ञ होते. १८२५ मध्ये डार्विन यांनी केंब्रिज विद्यापीठाच्या क्राईस्ट महाविद्यालयात नाव नोंदवून पदवी मिळवली. तिथे त्यांना कीटक व निसर्गातील जीव जिवाणूंच्या निरीक्षणाचा नाद लागला. १८२६ मध्ये कॅप्टन किंगने दक्षिण अमेरिका संशोधनाची मोहीम आखली त्यात ते सहभागी झाले. त्या मोहिमेवर ते पाच वर्ष होते. तिथे त्यांनी निरनिराळे पक्षी, प्राणी, कीटक, जीवजंतू एकमेकांशी कसे वागतात. ते एकमेकांशी आणि निसर्गाशी कसे जुळवून घेतात याचे निरीक्षण व अभ्यास केला व तेथे उत्क्रांतीवाद, सहजीवन, बळी तो कान पिळी ही मूलभूत नैसर्गिक तत्वे ते शिकले. याच दरम्यान माणसाचा मूळ पुरुष, चार पायी माकडपासून झाला असला पाहिजे असा विचार त्यांच्या डोक्यात घुमू लागला. त्यांनी याचे खूप संशोधन केले. वेगवेगळे प्राणी कसे निर्माण झाले यासंदर्भातही त्यांनी खूप संशोधन केले. या संशोधनावर आधारित ओरिजन ऑफ स्पेसिस हा ग्रंथ त्यांनी लिहिला. या ग्रंथातच त्यांनी उत्क्रांतवादाचा सिद्धांत मांडला आहे. या ग्रंथाच्या १२५० प्रति एकाच दिवसात विकल्या गेल्या. या ग्रंथामुळे त्यांचे सर्वत्र त्यांचे नाव झाले. या ग्रंथात त्यांनी मांडलेला उत्क्रांतीवादाचा सिध्दांत बायबलच्या विरुद्ध जात होता म्हणून अनेकांनी या सिद्धांताला विरोध केला. हा सिद्धांत बायबलच्या विरुद्ध जातो म्हणून त्याचा निषेध करण्यासाठी १८६० मध्ये ऑक्सफर्डमध्ये विलबर फोर्स या बिशपने सभा बोलावली. डार्विन यांचा एकीकडे पुरोगामी विचारांचे लोक समर्थन करीत होते दुसरीकडे प्रतिगामी लोक विरोध करीत होते. पण या सर्व घडामोडींचा डार्विन यांच्यावर कोणताही परिणाम होत नव्हता त्यांचे संशोधन चालूच होते. बिशप डार्विनला कडाडून विरोध करीत असताना हक्सले डी हुकर हे शास्त्रज्ञ मात्र डार्विन यांची बाजू सडेतोड व सोदाहरण मांडत होते. त्यामुळे उत्क्रांतीवादाच्या सिद्धांताला कडाडून विरोध करणाऱ्या बिशपला अखेर माघार घेऊन डार्विनचा सिद्धांत मान्य करावाच लागला.

१४ फेब्रुवारी 'मातृ-पितृ पूजन दिन' म्हणून साजरा व्हावा !

संस्कृतीप्रिय देश म्हणून जगात ओळख असलेल्या भारतातील तरुणांवर पाश्चात्य संस्कृतीचाच अधिक प्रभाव असल्याने व्हॅलेंटाईन डे सारखे भोगवादाला खतपाणी घालणारे दिवस इथे उत्साहाने साजरे होतात. तरुणपिढीला हानिकारक असल्याचे लक्षात आल्यावर अनेक देशांनी व्हॅलेंटाईन डे साजरा करण्यावर बंदी घातली. आपल्या देशात मात्र तो वर्षागणिक अधिक फोफावतो आहे. भारतीय संस्कृतीला अनुसरून १४ फेब्रुवारी हा 'मातृ-पितृ पूजन दिन' म्हणून साजरा करावा, अशी मागणी गेल्या काही वर्षांत संस्कृतीप्रेमी संघटना आणि नागरिकांकडून केली जात आहे; मात्र शासनाकडून त्यास कोणताही प्रतिसाद मिळताना दिसत नाही. शासन याबाबत पुढाकार घेण्यास तयार नसले तरी अनेक धार्मिक आणि सामाजिक संघटनांनी मागील काही वर्षांपासून १४ फेब्रुवारी हा दिवस मातृ पितृ पूजन दिन म्हणून साजरा करण्यास आणि त्याबाबत समाजामध्ये जागृती करण्यास सुरुवात केली आहे. समाजातूनही या उपक्रमास भरघोस प्रतिसाद मिळत आहे. याबाबत शाळा आणि महाविद्यालयांमध्येही जागृती केली जात आहे. विद्यार्थ्यांकडूनही याविषयी सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. भारतीय कुटुंबव्यवस्थेसारखी कुटुंबव्यवस्था जगात कुठेही नाही. आयुष्यभर कुटुंबाला एका धाग्यात बांधून ठेवण्याचे काम माता-पिता करत असतात. आपल्या इच्छा-आकांक्षा, आपले सुख बाजूला ठेवून अपत्याला जगातील सर्व सुख सुविधा मिळाव्यात यासाठी ते दिवसरात्र झटत असतात. त्यांचे ऋण फेडणे जरी शक्य नसले, तरी वर्षातून किमान एक दिवस त्यांचे मनोभावे पूजन करून त्यांच्या उपकाराप्रती कृतज्ञता व्यक्त करणे सहज शक्य आहे. १४ फेब्रुवारी या दिवशी मातृ-पितृ पूजन दिन साजरा केल्यास आपसूकच व्हॅलेंटाईन डेचे महत्व कमी होऊन तरुणवर्गामध्ये आई-वडिलांविषयी आदर वृद्धिंगत होण्यास साहाय्य होईल.

- सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई

रेडिओ : मनोरंजनाचे सर्वात जुने माध्यम

जगभरातील लोकांना शिक्षित करण्याबरोबरच आजपर्यंत माहितीची देवाणघेवाण आणि रेडिओने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. तसेच रेडिओ हे पत्रकारांसाठीसुद्धा एक महत्त्वाचे व्यासपीठ म्हणून उदयास आले आहे. रेडिओ हे माहिती पसरविण्याचे सर्वात शक्तिशाली साधन आहे. १३ फेब्रुवारी १९४५ रोजी संयुक्त राष्ट्र संघात रेडिओचे पहिल्यांदा प्रसारण झाले. त्यामुळे हा दिवस जागतिक रेडिओ दिन म्हणून साजरा केला जातो. पहिला जागतिक रेडिओ दिन औपचारिकपणे २०१२मध्ये साजरा करण्यात आला होता. जागतिक रेडिओ दिन २०२२ची थीम ''एवोलूशन- द वर्ल्ड इज ऑलवेज चेंजिंग होती. म्हणजेच विकासाबरोबर जगाचाही विकास होत आहे. थीम रेडिओची लवचिकता आणि टिकाऊपणा दर्शवते. याचा अर्थ जग जसजसे बदलत आहे, तसे रेडिओमध्येही नावीन्यता येत आहे. तरी आजही तो काळ आठवतो जेव्हा आपण रेडिओ ऐकून आनंदीत व्हायचो.

जागतिक रेडिओ दिवस दरवर्षी १३ फेब्रुवारी रोजी जगभरात साजरा केला जातो. या दिवशी दरवर्षी युनेस्को जगातील सर्व प्रसारक, संस्था आणि समुदायांच्या सहकार्याने विविध कार्यक्रम आयोजित करीत असतो. संवादाचे माध्यम म्हणून रेडिओच्या भूमिकेवर चर्चा करून लोकांना त्याबद्दल जागरूक केले जाते. रेडिओ ही जगभरातील माहितीची देवाणघेवाण करणारी सेवा आहे. आपत्ती किंवा आपत्कालीन परिस्थितीत रेडिओचे महत्त्व वाढते. अशा परिस्थितीत जगभरातील तरुणांना रेडिओची गरज आणि महत्त्वाची जाणीव करून देणे, हा जागतिक रेडिओ दिन साजरा करण्यामागचा उद्देश आहे. माहितीचा प्रसार करण्यासाठी रेडिओ हे सर्वात शक्तिशाली आणि स्वस्त माध्यम म्हणून ओळखले जाते. रेडिओ हे युगानुयुगे असले तरी त्याचा वापर संवादासाठी केला जात आहे. जागतिक रेडिओ दिवस कधी आणि का सुरू झाला? सन २०११ साली जागतिक रेडिओ दिनाची सुरुवात झाली. सन २०१०मध्ये स्पॅनिश रेडिओ अकादमीने प्रथमच १३ फेब्रुवारी हा जागतिक रेडिओ दिवस म्हणून साजरा करण्याचा प्रस्ताव मांडला. युनेस्कोच्या सदस्य देशांनी सन २०११मध्ये हा प्रस्ताव स्वीकारला आणि हा जागतिक रेडिओ दिवस म्हणून घोषित केला. नंतर सन २०१२मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या महासभेनेही ते स्वीकारले. त्यानंतर त्याच वर्षी १३ फेब्रुवारी रोजी युनेस्कोने प्रथमच जागतिक रेडिओ दिवस साजरा केला. याच दिवशी जागतिक रेडिओ दिन साजरा करण्याचे एक खास कारण आहे. वास्तविक, संयुक्त राष्ट्र रेडिओ १३ फेब्रुवारी १९४६ रोजी सुरू झाला. संयुक्त राष्ट्र रेडिओच्या वर्धापनदिनानिमित्त जागतिक रेडिओ दिवस साजरा केला जाऊ लागला. रेडिओ म्हणजे काय? रेडिओ म्हणजे एक असे यंत्र, जे विजेचा वापर करून इलेक्ट्रोमॅग्नेटिक तरंगे तयार करते, ज्यांच्या द्वारे संदेशाची देवाणघेवाण केली जाते. इलेक्ट्रोमॅग्नेटिक वेव्ह पाठवणाऱ्या रेडिओला ट्रान्समीटर तर तरंगे म्हणजेच वेव्ह स्वीकारून त्याचे रूपांतर आवाजात करणाऱ्या रेडिओला रिसीव्हर असे म्हटले जाते. रेडिओ ३०० एचझेड इतक्या क्षमतेने इलेक्ट्रोमॅग्नेटिक वेव्ह तयार करू शकते.

जगातला पहिला रेडिओ इटलीचे शास्त्रज्ञ मार्कोनी यांनी बनवला. सन १८९५मध्ये त्यांनी रेडिओचा शोध लावला आणि त्याचे पेटंटही मिळवले. मार्कोनीला फादर ऑफ रेडिओ असेही म्हणतात. इंग्रजांनी आणि अनेक युरोपीयन देशांनी हे तंत्रज्ञान आपापल्या वसाहतीत नेले. याच माध्यमातून अमेरिका, आफ्रिका, आशिया खंड आणि ऑस्ट्रेलिया असा रेडिओचा प्रसार झाला. त्या काळी हे माध्यम प्रामुख्याने कम्युनिकेशनसाठी वापरले जात होते. विशेषतः युद्धकाळात बातम्या लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी, अनेक खेळांच्या कॉमेंट्रीसाठी रेडिओचा वापर होऊ लागला. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतातही ब्रिटिशांनीच रेडिओ आणाला. दि.२३ जुलै १९२७ रोजी मुंबई आणि कलकत्ता येथे ऑल इंडिया रेडिओ नावाची दोन केंद्रे सुरू झाली. त्यानंतर सन १९३२मध्ये भारत सरकारने भारतीय प्रसारण सेवा नावाचा एक विभाग सुरू केला. सन १९३६मध्ये त्याचे नाव ऑल इंडिया रेडिओ- एआईआर असे ठेवण्यात आले. दरम्यान, सन १९२०चे दशक येता येता रेडिओला व्यावसायिक स्वरुप प्राप्त झाले. तसेच सन १९५०पर्यंत रेडिओ लोकप्रिय झाला होता. भारतातही रेडिओची सुरुवात सन १९२०च्या दशकात झाली. दि.२३ जुलै १९२७ रोजी मुंबईतून रेडिओ प्रसारण सेवा सुरू झाली. तसेच इंडियन ब्रॉडकास्टींग कंपनी लिमिटेडने मुंबई आणि कोलकता येथे रेडिओ स्टेशन सुरू केले. परंतु सन १९३०मध्ये ही कंपनी बंद पडली. त्यानंतर सरकारने ही कंपनी आपल्या ताब्यात घेत त्याला इंडियन स्टेट ब्रॉडकास्टींग सर्विस असे नाव दिले. त्यानंतर दि.८ जून सन १९३६मध्ये त्यांचे ऑल इंडीया रेडीओ असे नामकरण करण्यात आले. तसेच सन १९५६मध्ये पुन्हा याचे नाव बदलत आकाशवाणी करण्यात आले. हळूहळू आकाशवाणीचे जाळे देशभर पसरू लागले. आज २३ भाषांमध्ये ४१५ रेडिओ स्टेशनसह ऑल इंडीया रेडीओ ही जगातल्या सर्वात मोठ्या रेडिओ प्रसारण सेवेपैकी एक बनली आहे. तसेच सन २००१मध्ये भारतात खासगी रेडिओ स्टेशनलासुद्धा सुरुवात झाली होती. रेडिओ हे सर्वात जुने माध्यम असले तरी, संवादाचे एक महत्त्वाचे माध्यम म्हणून त्याच्याकडे बघितले जाते. सन १९४५मध्ये आजच्याच दिवशी संयुक्त राष्ट्र संघात रेडिओचे पहिले प्रसारण झाले होते. त्यामुळे हा दिवस 'जागतिक रेडिओ दिवस' म्हणून साजरा केला जातो. स्पेन रेडिओ अकादमीने सन २०१०मध्ये 'जागतिक रेडिओ दिवस' साजरा करण्यासंदर्भात प्रस्ताव सादर केला होता. त्यानंतर युनेस्कोच्या ६७व्या सत्रात १३ फेब्रुवारी हा दिवस 'जागतिक रेडिओ दिवस' म्हणून घोषित करण्यात आला. युनेस्कोच्या या निर्णयाला संयुक्त राष्ट्रसंघाने दि.१४ जानेवारी २०१३ रोजी मान्यता दिली. दरवर्षी युनेस्कोद्वारे जगभरातील रेडिओ प्रसारक आणि संघटनांनाच्या मदतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. तसेच संवादाचे माध्यम म्हणून रेडिओच्या भूमिकेवरसुद्धा चर्चा केली जाते. यावर्षी जागतिक रेडिओ दिवसाला 'रेडिओ आणि विविधता' ही थीम देण्यात आली आहे. तसेच विकास, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि संपर्क असे सबथीम सुद्धा देण्यात आले आहे.

!! समस्त श्रोत्यांना जागतिक रेडिओ दिनाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

- संकलन व सुलेखन -
कृष्णकुमार निकोडे गुरूजी
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

परिक्षा..

मनापासून हवी ना
कॉपी मुक्त परिक्षा
विचारप्रश्न स्वतास
नकोवाझोटअपेक्षा

परिक्षकां द्याअभय
गरजे नुसार सुरक्षा
साधने नवी आयुधे
सक्षम हो परिवेक्षा

कॉपी उद्युक्त संस्था
करावी जबरीशिक्षा
विद्यार्थ्यांकडे उगा
ना भारंभार अपेक्षा

सहज गाठेलंलक्ष्या
व्यापक ठेवा कक्षा
सारे अव्वलअशक्य
नको कराया उपेक्षा

भय बडगा शिक्षेचा
समालोचन त्यापेक्षा
कुवत असे भिन्न ती
का मोठ्या आकांक्षा

समुपदेशन जरुरीचे
तशीचं मिळो दिक्षा
छात्रा द्यावे हक्काचे
नकोफुकटात भिक्षा

नितळ निर्लेप व्हावी
छात्रगणांची समिक्षा
चमकतीलं खरे तारे
प्रगतीच्या अंतरिक्षा

- हेमंत मुसरीफ, पुणे
९७३०३०६९९६

केजरीवालजी अब 'आप' का क्या होगा?

दिल्ली विधानसभा निवडणुकीत तीन वेळा मुख्यमंत्री पद भुषविलेल्या अरविंद केजरीवाल यांचा आणि त्यांच्या 'आप' पक्षाचा मोठा पराभव झाला. भ्रष्टाचाराविरुद्ध २०११ सालच्या आंदोलनाच्या माध्यमातून अरविंद केजरीवाल यांचा राजकीय ऊदय झाला आणि 'आम आदमी पक्षा' ची स्थापना केली गेली तेव्हा देशातील राजकीय व्यवस्थेत बदल करायचा आहे, भ्रष्टाचार संपवायचा आहे असे दावे-प्रतिदावे केले गेले, पक्ष स्थापनेनंतर सामान्य जनतेमधुन काही प्रमाणात प्रतिसाद देखील मिळाला, अनेक निस्वार्थीसेवा करणारे सामाजिक कार्यकर्ते जोडले गेले, म्हणूनच केजरीवाल यांना दिल्लि च्या मुख्यमंत्री पदी बसण्याची संधी मिळाली, आपण सामान्य जनतेसारखे रहाणार, साध्या फ्लॅट मधे रहाणार असे त्यांनी सांगितले मात्र गेल्या काही वर्षांपासून त्यांचा शीशमहल चांगलाच गाजला, आणि एकुणच अकरा वर्षांच्या कालावधीतील त्यांचे मुल्यमापन दिल्लिकरांची करत केजरीवाल यांच्या पदरात पराभव टाकला आणि दिल्लित डबल इंजिनचे सरकार असावे असा कौल दिला, अल्पावधीतच राजकीय पक्ष म्हणून यश मिळवित राष्ट्रीय पक्षाचा दर्जा प्राप्त केलेल्या 'आप' च्या राजकीय भवितव्यावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

आयकर विभागात ऊच्च पदावरची नोकरी सोडुन इंडिया अगेन्स्ट करप्शन च्या माध्यमातून अरविंद केजरीवाल यांनी आपल्या काही सहकाऱ्यांसह भ्रष्टाचाराविरुद्ध मोहिम सुरू, कालांतराने त्यांना मॅगेशिस पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. २०११ साली लोकपाल कायदा व्हावा यासाठी प्रसिद्ध समाजसेवक अण्णा हजारे यांनी दिल्लीत जनलोकपालासाठी ऐतिहासिक उपोषण केले, या उपोषणात 'इंडिया अगेन्स्ट करप्शन' या सामाजिक संघटनेने महत्त्वाची भूमिका बजावली, त्यामध्ये अरविंद केजरीवाल, योगेंद्र यादव, किरण बेदी, विश्वंभर चौधरी यांची मेहनत होती. अखेर संसदेने लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेतले गेले. याच आंदोलनातून देशात आम आदमी पक्ष हा राजकीय पक्ष स्थापन झाला, आणि व्यवस्था बदलण्यासाठी 'आप' या राजकीय पक्षाची वाटचाल सुरू झाली, २०१३ साली आप ने दिल्लित विधानसभा निवडणुक लढवली आणि काँग्रेसच्या पाठिंब्यावर सरकार बनवले मात्र काही काळातच राजीनामा देऊन सरकार पडले आणि दिल्लित राष्ट्रपती राजवट लावली गेली. २०१५ साली अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखालील आप ने ऐतिहासिक असे बहुमत मिळवत सत्तर पैकी ७६ जागा मिळवल्या तर भाजपला केवळ तीन जागा आणि काँग्रेसला भोपळा मिळाला, २०२० मधेही 'आप' ने बासष्ठ तर भाजपला आठ आणि काँग्रेसला भोपळा मिळाला. कालांतराने आप ची राजकीय महत्त्वाकांक्षा वाढली आणि आप ने गोवा, गुजरात, पंजाब, हरियाणा या राज्यात विधानसभा निवडणुक लढल्या, आणि दिल्ली प्रमाणेच पंजाब मधे एकहाती सत्ता मिळवली मात्र इतर राज्यात 'आप' च्या हाती काही लागले नाही. अरविंद केजरीवाल असो कि नरेंद्र मोदी यांची मानसिकता एककल्ली कारभाराची. अरविंद केजरीवाल यांनी केलेले अनेक दावे फोल ठरले, सबका साथ, सबका विश्वास सबका प्रयास 'आप' मध्येच दिसत नाही म्हणूनच अनेकजण सोडून गेले. दोन वर्षांपूर्वी विरोधकांची मोट बांधली गेली तेव्हा 'आप' देखील इंडिया आघाडीत सामील झाला, लोकसभा निवडणुकीत काँग्रेस बरोबर जागा वाटप करत लोकसभा निवडणुक लढली मात्र विधानसभा निवडणुकीत एकमेकांविरुद्ध ऊभे ठाकले. दिल्लीमधे तब्बल तेरा-चौदा जागां एकमेकांविरुद्ध लढुन घालवल्या याला पार्श्वभूमी होती ती हरियाणा विधानसभा निवडणुकीची. गेल्या दहा वर्षांतील अँटी इन्कमबंसी, वादग्रस्त ठरलेली लिकर पॉलिसी, चौतीस हजार कोटी रुपयांचा शिशमहल, भ्रष्टाचाराच्या प्रश्नावरून झालेले आरोप आणि केजरीवाल सहित सर्वांनी खाल्लेली जेलची हवा यामुळे अरविंद केजरीवाल यांच्या मिस्टर क्लिन ही प्रतिमा काहीसी मलिन झाली आणि याची परिणती 'आप' च्या पराभवात झाला केजरीवालांच्या झाडुने यावेळेस 'आप'चीच झाडु सफाई झाली.

'आप' पक्षाचा नेहमीच भाजपची बी टीम म्हणून विरोधक आरोप करतात, इंडिया आघाडीत असुनही इंडिया आघाडीत तु-तु-मै-मै, आरोप प्रत्यारोप होत आले आहे, काँग्रेसला आरोपींच्या पिंजऱ्यात उभे केले जात आहे, तर काँग्रेसला वगळुन तिसरा मोर्चा काढण्यात येण्याची चर्चा अधुन मधुन होत आहे,मात्र भाजप विरोधात लढायचे काँग्रेस शिवाय आघाडीला काहीच अर्थ नाही, कि ईतर राजकीय पक्षांच्या भवितव्याला अर्थ नाही. दर निवडणूकीत प्रादेशिक पक्ष, नेते यांची ताकद नष्ट होत आहे, या निवडणुकीत 'आप' चा निकाल लागला. आता आप कडे केवळ पंजाब राज्यातील सत्ता आहे ती देखील कितपत टिकणार आणि ऑपरेशन लोटस कधी राबवले जाणार हे सांगता येत नाही, विरोधी पक्षाची सरकार पाडण्याची एकही संधी भाजप सोडत नाही हा नव भाजपचा इतिहास आहे. अशा वेळी आप च्या राजकीय वाटचालीवर, भवितव्यावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.दिल्लि निवडणूकीत काँग्रेस त्रिफळाचीत तर आप ची झाडु सफाई झाली.

केजरीवालजी अब 'आप' का क्या होगा?
- अनंत बोरसे
शहापूर जिल्हा ठाणे
९१५८४९५०३७

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

थोडक्यात

मोखाडा तालुक्यातील पोलिस पाटील रिक्त पदे भरा - प्रदीप वाघ


श्री. प्रदिप माधव वाघ

अक्षराज : प्रमोद मौळे

दि.११, जव्हार (पालघर) : मोखाडा तालुक्यातील अनेक गावांमध्ये पोलिस पाटील पदे रिक्त आहेत. मागील काही वर्षा पासून पोलिस पाटील पद भरती प्रक्रिया झाली नसून अनेक पोलिस पाटील सेवा निवृत्त झाले आहेत. त्यामुळे शालेय विद्यार्थ्यांना लागणारे दाखले, शेतकरी बांधवांना लागणारे दाखले, जमिन मोजणीसाठी पोलिस पाटील आवश्यक असतो, महसूल विभागाच्या अनेक दाखल्यासाठी पोलिस पाटलांच्या दाखल्याची गरज असते. शिवाय पोलिस पाटील हे गावातील शांतता, कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी आजही खेडोपाडी खुप महत्वाचे पद आहे. त्यामुळे ही पदे तातडीने भरावीत. अशी मागणी मोखाडा पंचायत समितीचे उपसभापती प्रदीप वाघ यांनी उपविभागीय दंडाधिकारी जव्हार यांच्याकडे पत्र देऊन केली आहे.

संविधान गौरव वक्तृत्व स्पर्धेत रुईया महाविद्यालयाची कु.सलोनी राणे प्रथम

अक्षराज : भानुदास गायकवाड

दि.११, कल्याण (ठाणे) : वांद्रे, मुंबई स्थित चेतना महाविद्यालयातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाच्या वतीनं आयोजित करण्यात आलेल्या आंतरमहाविद्यालयीन संविधान गौरव वक्तृत्व स्पर्धेत माटुंग्याच्या रुईया महाविद्यालयाची सलोनी सतीश राणे हिने प्रथम पारितोषिक पटकावून प्रतिष्ठेचा फिरता चषक पटकावला आहे. तर कल्याणच्या बिरला महाविद्यालयाची अनुष्का अरुणेश मिश्रा हिने दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळविले आहे. चर्चगेट, मुंबई येथील शासकीय विधी महाविद्यालयाच्या अतुल आत्माराम लोंढे याला तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे. रुपारेल महाविद्यालयाची संचिता संपत चिकणे, पाटकर महाविद्यालयाची सुप्रिया अजय खरवार व भाईंदरच्या अभिनव महाविद्यालयाची शीतल राजेंद्रसिंह महर यांना उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली आहेत.

जागतिक युद्धजन्य परिस्थिती आणि भारताचे परराष्ट्र धोरण, एक देश एक निवडणूक धोरण कितपत व्यवहार्य व सरकारच्या मोफत योजना आणि वाढती बेकारी या विषयांवर तरुणाईची मतं जाणून घेण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत स्पर्धक विद्यार्थ्यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण मांडणी केली. केंद्रीय उत्पादन शुल्क विभागाचे माजी सहआयुक्त डॉ. प्रभाकर रोकडे व एमएमपी शहा महाविद्यालयाच्या प्रा. सुप्रिया शिंदे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिलेल्या या आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत मुंबई विद्यापीठाशी संलग्न विविध महाविद्यालयातील तीस स्पर्धकांनी सहभाग नोंदविला होता. स्पर्धेअंती झालेल्या पारितोषिक वितरण समारंभात यशस्वी विद्यार्थ्यांना सन्मानचिन्हासोबत रोख रक्कम व प्रमाणपत्र देतानाच स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांनाही प्रमाणपत्रे देण्यात आली. चेतना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय जगताप उपप्राचार्य प्रा. गिरीश साळवे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचे अध्यक्ष प्रा. आनंद देवडेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेल्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. कैलाश लांडगे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. गजानन डोंगरे यांनी केले तर कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा.हेमंत कांबळे यांनी आभारप्रदर्शन केले. प्रा. डॉ.तनुजा कोळी, प्रा.चंद्रकांत चिकणे यांच्यासह अध्यासनाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी घेतलेले परिश्रम व चेतना महाविद्यालयाच्या शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसह विद्यार्थ्यांनी केलेल्या सहकार्यामुळे कार्यक्रम कमालीचा यशस्वी झाला.

माऊंटन बायकिंगमध्ये प्रणिता ला सुवर्ण, ऋतिका ला कांस्य

अक्षराज : प्रतिनिधी

दि.११, उत्तराखंड : राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील माऊंटन बायकिंगमधील एमटीबी सायकलिंग प्रकारात महाराष्ट्राची आंतरराष्ट्रीय सायकलपटू प्रणिता सोमण हिने लागोपाठ सलग दुसरे सुवर्णपदक पटकावले. याच प्रकारात ऋतिका गायकवाड ने कांस्यपदक संपादन केले. निसर्गरम्य उत्तराखंडच्या सातताल डोंगरदर्यातील खडकाळ मार्गावरील सात फेर्यांची शर्यत प्रणिता सोमणने १ तास २२ मिनिटे १०.८१८ सेकंदात पूर्ण केली. तिची सहकारी व नाशिकची खेळाडू ऋतिका गायकवाड हिने कांस्यपदक जिंकताना हेच अंतर १ तास २७ मिनिटे ५.६२३ सेकंदात पार केले. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत प्रथमच माउंटन बाईकिंग या खेळाचा समावेश करण्यात आला आहे. प्रणिता हिने क्रॉस कंट्री टाईम ट्रायल प्रकारात सुवर्णपदक जिंकले होते. टाईम ट्रायल मधील अव्वल यशामुळे आज तिने अतिशय आत्मविश्वासाने ही शर्यत जिंकली. टाईम ट्रायल शर्यतीप्रमाणे आजही तिला कर्नाटकची आंतरराष्ट्रीय सायकलपटू स्टार नरझरी हिचे आव्हान होते. मात्र, प्रणिता हिने तिला कसे मागे ठेवायचे याचे योग्य नियोजन करून सलग दुसर्या सुवर्णयशाला गवसणी घातली.

टाईम ट्रायलमध्ये काल सुवर्णपदक जिंकले होते. त्यामुळे माझा आत्मविश्वास उंचावला होता. आज त्याचा फायदा घेत अन्य स्पर्धकांवर मात करू माझे सहकारी ऋतिका हिला कास्यपदक मिळाल्यामुळे मला अतिशय आनंद झाला आहे. असे प्रणिता हिने सांगितले. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेमध्ये पदक मिळवण्याचे माझे ध्येय साकार झाल्यामुळे मला खूपच समाधान झाले आहे. त्यातही प्रणिता या माझ्या सहकारी खेळाडू बरोबर पदकाच्या व्यासपीठावर उभे राहण्याची संधी मिळाली. याचा आनंद मोठा असल्याचे ऋतिकाने सांगितले.

राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे जिया खान यांचा दौरा

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.११, अकोला : राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष (मंत्री दर्जा) प्यारे जिया खान हे दिनांक ११ फेब्रुवारी २०२५ रोजी अकोला जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. दौऱ्यानुसार, मंगळवार, दि.११ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता शासकीय विश्रामगृह, अकोला येथे आगमन. सकाळी १०.३० वाजता अकोला येथून वाडेगावकडे प्रयाण.

सकाळी ११ वाजता वाडेगाव येथील अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांना भेट. दुपारी १२ वाजता पातूर येथील अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांना भेट. दुपारी २.३० वाजता पारस येथील अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांना भेट. दुपारी ४.३० वाजता अकोला येथून नागपूरसाठी प्रयाण.

कर्जत चारफाटा वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी तोडगा

कर्जत बायपासकरिता केंद्रीय रस्ते विकास मंत्री अनुकूल

अक्षराज : चंद्रकांत सुतार

दि.११, माथेरान : मुंबई, पुणे आणि नाशिककडून कर्जतमार्गे येणाऱ्या वाहनांसाठी चारफाटा हा वाहतूक कोंडीचा प्रमुख केंद्रबिंदू ठरत आहे. विशेषतः नेरळ-माथेरान, कर्जत-मुरबाड-शहापूर, तसेच कर्जत स्टेशन आणि चौकमार्गे मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग जोडणाऱ्या या भागात सातत्याने वाहतूक कोंडी जाणवते.

यावर उपाय म्हणून केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी सकारात्मक भूमिका घेतली असून, कर्जत बायपास लवकरच मंजुरीच्या प्रक्रियेत येणार असल्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे.

वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना मनस्ताप

सध्या कर्जत शहरात प्रवेश करणाऱ्या वाहनांसाठी फक्त एक छोटा रेल्वे पूल उपलब्ध असल्याने, येथे मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होते. परिणामी, प्रवाशांना अनेक तास खोळंबून राहावे लागते, वेळेचा अपव्यय होतो आणि स्थानिक नागरिकांना मोठ्या मनस्तापाला सामोरे जावे लागते. याशिवाय, राष्ट्रीय महामार्ग ५४८अ (शहापूर-मुरबाड-कर्जत-खोपोली-



नागोठणे) या मार्गावरून मोठ्या प्रमाणात कंटेनर वाहतूक होत असल्याने वाहतूक कोंडीची समस्या अधिकच वाढली आहे.

कर्जत बायपाससाठी भाजप कार्यकर्त्यांचा पुढाकार

कर्जत बायपासची गरज ओळखून भाजप कार्यकर्ते सुनील गोगटे यांनी नवी दिल्लीत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली आणि बायपास मंजुरीसाठी निवेदन दिले. त्यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे राज्य रस्ते विकास महामंडळाच्या कार्यकारी अभियंता संदीप पाटील यांच्या कार्यालयाने कर्जत बायपासचे अंदाजपत्रक तयार केले आहे.

केंद्रीय मंत्र्यांकडून सकारात्मक प्रतिसाद

या निवेदनाच्या अनुषंगाने नितीन गडकरी यांनी कर्जत बायपासच्या आवश्यकतेला मान्यता दर्शवली असून, लवकरच मंजुरी देण्याचे आश्वासन दिले आहे. हा बायपास पूर्ण झाल्यास, कर्जत शहरात प्रवेश करणाऱ्या वाहनचालकांची वाहतूक कोंडीतून मोठ्या प्रमाणावर सुटका होणार असून नागरिकांचा ही त्रास कमी होईल.

कर्जत करांसाठी मोठी दिलासादायक बातमी

कर्जत बायपास मंजूर झाल्यास, वाहतुकीसाठी एक सुव्यवस्थित पर्यायी मार्ग उपलब्ध होईल आणि शहरातील मुख्य रस्त्यावरील ताण कमी होईल. तसेच, मुंबई, पुणे, नाशिक आणि शहापूर, मुरबाड मार्गे येणाऱ्या वाहनांसाठी प्रवास अधिक सुकर होईल.या निर्णयामुळे पर्यटक, स्थानिक नागरिक तसेच व्यावसायिक वाहनचालक यांना मोठा दिलासा मिळणार आहे आणि कर्जतचा विकास अधिक वेगाने होण्यास मदत होईल.

खेड बु:, सुखेड येथे वडजाई देवीच्या यात्रेला आजपासून प्रारंभ

अक्षराज : बाळू धायगुडे

दि.११, खंडाळा (सातारा) : खेड बु.आणि सुखेड ता.खंडाळा येथील भाविकांचे श्रध्दास्थान असणाऱ्या श्री वडजाई देवीची बुधवार, दिनांक १२ व गुरुवार, दिनांक १३ फेब्रुवारी २०२५ रोजी दोन दिवस वार्षिक यात्रा भरत आहे.

यात्रा कमिटी, देवीचे मानकरी व ग्रामस्थांच्या वतीने यात्रेची सर्व ती जय्यत तयारी करण्यात आली असल्याचे सांगण्यात आले. खेड बु.आणि सुखेड दोन्ही गावात वडजाई देवीचे दोन भव्य व आकर्षक मंदिरे आहेत.येथे दरवर्षी माघ पौर्णिमेला देवीची मोठी यात्रा भरते.बाहेरगावाहून यात्रेसाठी येणा-यांची संख्या मोठी असते. दोन्ही गावातील पुणे, मुंबई, सातारासह बाहेरगावी नोकरी व्यवसायानिमिताने बाहेर असलेले चाकरमानी यात्रेच्या निमित्ताने मोठ्या संख्येने हजेरी लावत असतात. खंडाळा, वाई, फलटण, बारामती, पुरंदर, कोरेगाव, माळशिरस, तालु-क्यासह दौंड, चौफुला, केडगाव या परिसरातून येणाऱ्या भाविकांची

वडजाई देवी यात्रेत संख्या मोठी असते. नवसाला पावणारी देवी म्हणून या देवीवर भाविकांची मोठी श्रध्दा आहे. वर्षभर दर मंगळवारी, शुक्रवारी, आमवस्या व पौर्णिमेलाही येथे भाविकांची गर्दी होते. तसेच नवरात्र निमित्त ९ दिवस मंदिरात विविध धार्मीक कार्यक्रम पार पाडले जातात. यात्रे निमित्त दोन्ही गावातील यात्रा समितीने मंदिराला रंगरंगोटी करुन परिसराची स्वच्छता केली आहे.

दोन्ही गावातील वडजाई देवी मंदिरांवर आकर्षक विद्युत रोषणाई करुन मंदिरे सजवण्यात आलेली आहेत. या दोन्ही वडजाई माता मंदिराबाबत खेड बु.गावची वडजाईदेवी थोरली वडजाई म्हणून तर सुखेडची धाकटी वडजाई अशी मान्यता आहे. या दोन्ही वडजाई देवीच्या मंदिरात सेवेचा मान धनगर समाजातील हाके कुटूंबियांना आहे.बुधवार, दि.१२ रोजी यात्रेचा पहिला दिवस आहे. या दिवशी पहाटेपासून देवीच्या दोन्ही मंदिरात धार्मिक कार्यक्रम सुरू होतात. देवीला अभीषेक घालून षडोशोपचारी पूजा केली जाते.आकर्षक पोशाख केला जातो. त्यानंतर दिवसभर देवीला पुरण पोळीचा नैवेद्य व नारळ फोडून देवीचे दर्शन घेण्यासाठी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित असतात. रात्री आरती, धनगरी ओव्या व देवीची गाणी गाऊन जागर व रात्री बारा वाज़ल्यानंतर देवीच्या मुखवट्याची पालखीतून सासण काठीसह ढोल ताशा व सनईच्या गजरात मिरवणूक (छबीना) काढण्यात येणार असून गुरुवार, दि.१३ रोजी यात्रेचा मुख्य दिवस असून सकाळपासून भावीक देवीच्या दर्शनासाठी गर्दी करतात. दोन्ही मंदिरे भाविकांच्या गर्दीने फुलून जात असतात. दुपारी देवीच्या तसेच ग्रामदैवतांचे सासन काठ्या पालख्यांची वाजत - गाजत भव्य मिरवणूक काढून सायं.४ वाजता दोन्ही देवीचे पुजारिंकडून भाकणूक (भाकित) होणार आहे. दरम्यान यात्रेनिमित्त नारळ, प्रसाद, मिठाई, थंडपेय विक्रीची दुकाने तसेच छोटे मोठे व्यावसायीक स्टॉलधारक येथे मोठ्या संख्येने येऊन आपली दुकाने थाटतात. खेळणीवाले व पाळणेवाले यांचीही येथे रेलचेल असते. त्यांच्या नियोजनाची ही लगबग येथे गेल्या दोन दिवसापासून सुरु झाली आहे. या निमित्ताने खेड बु.ग्रामस्थांकडून येथे दरवर्षी होणाऱ्या बैलांच्या प्रेक्षणीय झुंजी यावर्षी देखील होणार आहेत. यात्रा समिती व ग्रामस्थांच्या वतीने यात्रेसाठी येणाऱ्या भावीकांसाठी पिण्याच्या पाण्याचे टँकर, प्रवासी वाहतूकीकरिता एस.टी.बसेसची व्यवस्था तसेच अनुचित काही प्रकार घडु नये म्हणून लोणंद पोलीस स्टेशन चे सहाय्यक निरीक्षक आपल्या सहका-यांसह येथे बंदोबस्त तैनात असतो. या टीमचे चांगले सहकार्य लाभत असल्याने यात्रा ही शांततामय वातावरणात पार पडते.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पक्षाचा एल्गार; विविध मागण्यांसाठी एक दिवसीय धरणे आंदोलन

अक्षराज : दिवाकर घेर

दि.११, नागपूर : चिचोली (खापरखेडा) जि.प.सर्कल मागील अनेक वर्षापासून मूलभूत सुविधां पासून वंचित आहे. शासन दरबारी उपाययोजना करण्यासंदर्भात अनेकदा पत्रव्यवहार करण्यात आला. मात्र, दखल घेण्यात आली नसल्याने रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियातर्फे एल्गार पुकारला असून विविध समस्या मागण्यांसाठी एक दिवसीय धरणे आंदोलन पुकारले आहे. पहिल्या टप्प्यात आरपीआय नेते पृथ्वीराज बोरकर यांचे नेतृत्वात दिनांक १४ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ पर्यंत एक दिवसीय धरणे आंदोलन मेन रोड भीमालय' खापरखेडा येथे करण्यात येणार आहे. समस्या सोडविण्याबाबत संबंधित प्रशासनाने पुढाकार अपेक्षित आहे मात्र दखल घेण्यात आली नाही तर दुसऱ्या टप्प्यात साखळी उपोषण करण्यात येणार आहे.

यासंदर्भात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे व संबंधित प्रशासनाला निवेदन देण्यात आले आहे. सदर निवेदनात खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रात स्थानिक सुशिक्षित बेरोजगाराना कंत्राटी कामगार म्हणून सामावून घेणे, चिंचोली, खापरखेडा, भानेगाव, चनकापुर परिसरातील आबादी वस्ती मधील रहीवासियांना मालकी पट्टे वाटप करणे, रोपवे व जॉर्ज कॉलोनीच्या जागेवर खेळाचे मैदान, बस स्टॉप, बगीचा, सार्वजनिक शौचालय महाजनकोच्या सीएसआर फंडातून बांधकाम करणे, वीज केंद्रात स्थानिक कंत्राटदारांना प्राधान्याने कामे देणे, चिंचोली (खापरखेडा) येथे ग्रामीण रुग्णालय मंजुर करणे, नविन बिना ते रेल्वे चौकी खापरखेडा पर्यंत सर्विस रोड तयार करणे, खापरखेडा रेल्वे उड्डाण पूलाचे बांधकाम करणे, चिंचोली, खापरखेडा, भानेगाव आदि गावांना सर्व प्रकारच्या मूलभूत सुविधा पुरविणे, झुडपी जंगल राखीव असलेल्या कोराडी रोडवरील १४ एकर जागेवर इको पार्क ची निर्मिती करणे, खापरखेडा येथे जल जिवन मिशन अंतर्गत पिण्याचे पाणी पुरवठा योजना त्वरीत पूर्ण करणे, भानेगाव कोळसा खाणीमुळे बाधीत प्रकल्पगस्त गावातील नागरिकांचे त्वरित पुनर्वसन करणे, औष्णिक विद्युत केंद्र खापरखेडा परिसरातील पडीक व मोकळ्या जागेवर वृक्ष लागवड व देखभाल कामाकरिता महिला बचत गटांना वाटप करणे, चिचोली खापरखेडा ग्रामपंचायतच्या सर्वांगीण विकासासाठी नगरपंचायत त्वरित घोषित करण्या संदर्भात निर्णय घेणे आदी मागण्या नमूद करण्यात आल्या आहेत. यासंदर्भात चेमरी येथे झालेल्या पत्रपरिषदेत आरपीआय नेते पृथ्वीराज बोरकर, राहुल बागडे, माजी सरपंच प्रकाश लांजेवार, पृथ्वीराज बागडे, राजू देशभ्रतार, धीरज देशभ्रतार, अभिषेक शेंडे, शरद पाटील, अभय तुपसुंदरे, सुरेश नागदेवने इत्यादी प्रामुख्याने उपस्थित होते.

टेबल टेनिसमध्ये महाराष्ट्राला रौप्यपदक

अक्षराज : प्रतिनिधी

दि.११, उत्तराखंड : टेबल टेनिसमध्ये महाराष्ट्राच्या खेळाडूंनी पुरुष गटात पश्चिम बंगालच्या बलाढ्य खेळाडूंना चिवट लढत दिली. मात्र, हा सामना ०-३ असा गमवावा लागखाणे ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत त्यांना रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. परेड मैदानाजवळील इनडोअर स्टेडियम मध्ये सुरू असलेल्या या स्पर्धेत महाराष्ट्राच्या जश मोदी याने अर्निबन घोष याला चिवट झुंज दिली. मात्र, अखेर त्याने हा सामना ७-११, १२-१०, ११-६, ४-११ असा गमावला. या सामन्यात दोन्ही खेळाडूंनी टॉप स्पिन फटक्यांचा सुरेख खेळ केला. मात्र, अखेर बंगालच्या खेळाडूने बाजी मारली. महाराष्ट्राच्या रेगन

अल्बुकर्क याला बंगालच्या आकाश पाल याने ११-५, ११-८, १२-१० असे सहज हरविले. आकाशने काउंटर अटॅक पद्धतीचा बहारदार खेळ केला.

महाराष्ट्राच्या चिन्मय सोमय्या याला सौरव शाह याने ११-७, ११-८, ८-११, ११-८ असे पराभूत करीत बंगालच्या विजेतेपदावर मोहोर नोंदविली. महाराष्ट्र संघाला साखळी गटापासूनच कडवे आव्हान होते त्यामुळे बाद फेरीत प्रवेश करण्याबाबत आम्ही साशंक होतो परंतु आमच्या खेळाडूंनी प्रत्येक सामन्यात सातत्यपूर्ण आणि प्रभावी कामगिरी केली त्यामुळेच आम्हाला अंतिम फेरीपर्यंत धडक मारता आली. अंतिम फेरीत आमच्या खेळाडूंनी चांगले प्रयत्न केले मात्र अखेर बंगालच्या अधिमुक अनुभवी खेळाडूंनी त्यांच्या नावलौकिकास साजेसा खेळ केला. असे महाराष्ट्र संघाचे प्रशिक्षक महेंद्र चिपळूणकर यांनी सांगितले. महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन पथक प्रमुख संजय शेटे, स्मिता शिरोळे, प्रा.सुनील पूर्णपात्रे यांनी महाराष्ट्र संघाच्या खेळाडूंचे रुपेरी कामगिरी बाबत अभिनंदन केले.

जिम्नॉस्टिक्समध्ये सुवर्ण पदकांचा षटकार, पदकतालिकेत महाराष्ट्र दुसर्या स्थानावर

अक्रोबॅटिकमध्ये सुवर्ण चौकारासह एका रौप्य, रिदमिक्समध्ये सांघिक सुवर्ण, ट्रॅम्पोलिनमध्येएक सुवर्ण, एक रौप्य

अक्षराज : प्रतिनिधी

दि.११, उत्तराखंड : जिम्नॉस्टिक्समध्ये सुवर्णपदकांचा षटकार झळकवित महाराष्ट्राने ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील १५वा दिवस गाजविला. अक्रोबॅटिक प्रकारात तालबद्ध, सुरबद्ध आणि अचंबित करणार्या रचना सादर करुन चार सुवर्णपदकांसह एक रौप्य अशी पाच पदकांची लयलूट करीत केली. पाठोपाठ रिमिक्स मध्ये सांघिक सुवर्ण व ट्रॅम्पोलिन वैयक्तिक प्रकारात एक सुवर्ण आणि एका रौप्य पदकाची कमाई केली. जिम्नॉस्टिक्समधील यशाने ३८ सुवर्ण पदकांसह पदकतक्यात महाराष्ट्र दुसर्या स्थानावर आहे.

भागीरथी क्रीडा संकुलात सुरू असलेल्या स्पर्धेत महाराष्ट्राचा बोलबाला दिसून आला. अक्रोबॅटिकमध्ये महाराष्ट्राने महिला दुहेरी, मिश्र दुहेरी, पुरुष सांघिक गट व महिला तिहेरी या चार गटात सुवर्णपदके जिंकले. मात्र, या प्रकाराच्या पुरुष दुहेरीत महाराष्ट्राच्या जोडीला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. रिदमिक्स प्रकारात महाराष्ट्राने सांघिक गटात नेत्रदीपक आणि अचंबित करणार्या रचना सादर करुन सुवर्णपदकावर मोहोर उमटवली. संयुक्ता काळे, किमया कार्ले, परिणाम मदनपोत्रा व शुभश्री मोरे या महिला चौकडीने एकूण २३९.०५ गुणांची कमाई करीत महाराष्ट्राला हे सोनेरी यश मिळवून दिले.

ट्रॅम्पोलिन प्रकारात महाराष्ट्राच्या खेळाडूंनी वैयक्तिक प्रकारात एक सुवर्ण आणि एका रौप्य पदकाची कमाई केली. पुरुषांच्या वैयक्तिक गटात छत्रपती संभाजीनगरच्या आयुष मुळे याने सर्वाधिक ४८.७४ गुणांची कमाई करीत महाराष्ट्राला सुवर्णपदक जिंकून दिले. गतवर्षी या स्पर्धेत कांस्यपदकावर समाधान मानावे लागलेल्या आयुष ने यावेळी सुवर्णपदकाला गवसणी घातली. सर्व पदक विजेत्यांचे पथकप्रमुख संजय

शेटे, उप पथकप्रमुख स्मिता शिरोळे यांनी क्रीडा संकुलात उपस्थित राहून अभिनंदन केले. जिम्नॉस्टिक्समधील या यशाने अव्वल स्थानाकडे महाराष्ट्राची वाटचाल सुरू झाली असल्याचे पथकप्रमुख संजय शेटे यांनी सांगितले.

प्रशिक्षक संजय मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली त्याने हे यश मिळविले. ही तर फक्त माझी सुरुवात आहे. या स्पर्धेत देशासाठी पदक जिंकणे हेच माझे मुख्य लक्ष होय, असे आयुषने सांगितले. महिलांच्या वैयक्तीत गटात डोंबिवलीच्या चैत्राली सोनवणे हिने ३९.२८ गुणांसह रौप्यपदक जिंकले. दहावीत शिकणारी चैत्राली देखील संजय मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करते. या प्रकारात सुवर्णपदकाची प्रबळ दावेदार असलेली रिया पाखरे आपली कला सादर करताना खाली पडली अन् तिचे सुवर्ण पदकाचे स्वप्न एका क्षणात भंगले. हातचे पदक गेल्याने तिला मैदानावरच अश्रू आणि हुंदके अनावर झाले होते.

अक्रोबॅटिकमध्ये महिला दुहेरीत ऋतुजा जगदाळे व निक्षिता खिल्लारे या महाराष्ट्राच्या जोडीने जबरदस्त बॅलन्स आणि अचंबित करणार्या रचना सादर करून ५१.२५० गुणांची कमाई करीत सुवर्णपदक खेचून आणले. प. बंगालला ४४.७०० गुणांसह रौप्य व केरळने ४३.५०० गुणांसह कांस्यपदक जिंकले. ऋतुजा आणि निक्षिता दोघीही मुंबईच्या असून, राहुल ससाणे व प्रवीण शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबईतील श्री

नारायणराव आचार्य विद्या निकेतन शाळा, चेंबूर येथे सराव करतात. ऋतुजाचे राष्ट्रीय स्पर्धेतील हे दुसरे सुवर्णपदक असून, निक्षिताचे हे पहिलेच पदक होय.

मिश्र दुहेरीत शुभम सरकटे व रिद्धी जैस्वाल या छत्रपती संभाजीनगरच्या जोडीने सर्वाधिक ५२.२५० गुणांची कमाई करीत सुवर्णपदक जिंकले. केरळने ४७.७२० गुणांसह रौप्य, तर कर्नाटकने ४६.२९३ गुणांसह कांस्यपदक जिंकले. शुभम व रिद्धी या महाराष्ट्राच्या जोडीचे राष्ट्रीय स्पर्धेतील हे पहिलेच सुवर्णपदक होय. दोघेही प्रशिक्षक प्रवीण शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली संभाजीनगर येथील के आर एस स्पोर्ट्स अकॅडमीमध्ये सराव करतात. पुरुष सांघिक गटात प्रशांत गोरे, नमन महावर, रितेश बोराडे, यज्ञेश भोस्तेकर या मुंबईच्या चौकडीने ६४.६५० गुणांची कमाई करीत महाराष्ट्राला तिसरे सुवर्णपदक जिंकून दिले. केरळने ६१.२१० गुणांसह रौप्य, तर कर्नाटकने ५३.७४० गुणांसह कांस्यपदक जिंकले. प्रशिक्षक राहुल ससाणे यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्राच्या पुरुष संघाने हे सोनेरी यश संपादन केले. त्यानंतर महिला सांघिकमध्येही अक्षता ढोकळे, अर्ना पाटील व सोनाली बोराटे या त्रिमूर्तीनी ६१.७३० गुणांची कमाई

करीत महाराष्ट्राला अक्रोबॅटिकमधील चौथे सुवर्णपदक जिंकून दिले. प बंगालने ५१.५४० गुणांसह रौप्य, तर कर्नाटकला ४२.७५० गुणांसह कांस्यपदक जिंकले. राहुल ससाणे यांच्याच मार्गदर्शनाखाली महाराष्ट्राच्या महिला संघाने सोनेरी यश मिळाले, हे विशेष. या प्रकारात फक्त महाराष्ट्राला पुरुष दुहेरीत रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. गणेश पवार व आदित्य काळकुंद्रे या मुंबईच्या जोडीने ६१.०२० गुणांसह हे रूपेरी यश मिळविले. या प्रकारात कर्नाटकने ६२.०५० गुणांसह सुवर्ण, तर हरयाणाने ५९.८४० गुणांसह कांस्यपदक जिंकले. रिदमिक्स प्रकारात महाराष्ट्राने सांघिक गटात नेत्रदीपक आणि अचंबित करणार्या रचना सादर करुन सुवर्णपदकावर मोहोर उमटवली. संयुक्ता काळे, किमया कार्ले, परिणाम मदनपोत्रा व शुभश्री मोरे या महिला चौकडीने एकूण २३९.०५ गुणांची कमाई करीत महाराष्ट्राला हे सोनेरी यश मिळवून दिले. जम्मू काश्मीर संघाला २३१.६५ गुणांसह रौप्य पदकावर समाधान मानावे लागले, तर १९२.६० गुणांसह हरयाणाने कांस्यपदक जिंकले. प्रशिक्षक मानसी गावंडे यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्राने हे अव्वल यश संपादन केले. या चारही मुली ठाण्याच्या असून त्या ठाण्यातच द फिनिक्स जिम्नॅस्टिक अकादमी येथे सराव करतात.

सुरक्षित इंटरनेट वापराविषयी जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यशाळा

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.११, बुलडाणा : इंटरनेटच्या सुरक्षित आणि जबाबदार वापरासाठी विशेषतः मुले, महिला आणि तरुणांमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी साजरा केला जाणाऱ्या सुरक्षित इंटरनेट दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अधिकारी व कर्मचाऱ्यांचा कार्यशाळा घेण्यात आली.

दरवर्षीप्रमाणे फेब्रुवारीच्या दुसऱ्या मंगळवारी जगभरात सुरक्षित इंटरनेट दिवस पाळला जातो. यावर्षी दिनांक ११ फेब्रुवारी २०२५ रोजी टूगेदर फॉर अ बेटर इंटरनेट या संकल्पनेअंतर्गत हा दिवस साजरा करण्यात आला. या कार्यशाळेला निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे, उपजिल्हाधिकारी (महसूल) समाधान गायकवाड, उपजिल्हाधिकारी अजिंक्य गोडगे, अजित जंगम, जिल्हा माहिती तंत्रज्ञान अधिकारी सुनील खुले यांचे सह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय ११ फेब्रुवारीपासून, एक देशव्यापी जागरूकता मोहीम सुरु करत आहे. केंद्र सरकारच्या माहिती सुरक्षा आणि शिक्षण जागरुकता प्रकल्पांतर्गत आयोजित या उपक्रमाच्या माध्यमातून जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इंटरनेट वापरकर्त्यां अधिकारी, कर्मचाऱ्यांना सुरक्षित ऑनलाइन पद्धती, सायबर स्वच्छता, प्रमुख सायबर धोके, आणि इंटरनेट स्ट्रॅटेजीज याबाबत माहिती देण्यात आली. यासह इंटरनेटचे फायदे व तोटे, सायबर फ्रॉड, फिशिंग, स्मिशिंग, डिजिटल

अरेस्ट, ऑनलाईन फसवणुकीपासून बचाव आदी महत्त्वपूर्ण माहिती सुनील खुले यांनी या कार्यशाळेत दिली. जिल्हा माहिती तंत्रज्ञान अधिकारी सुनील खुले यांनी यावेळी सादरीकरण करुन सुरक्षित इंटरनेट वापराबाबत माहिती दिली.

सामूहिक कॉपी आढळल्यास केंद्राची मान्यता रद्द करा - मुख्यमंत्री फडणवीस यांचे आदेश

बुलडाण्यात बारावीच्या ३४ हजार ६३५ विद्यार्थ्यांची परीक्षा; ११६ परीक्षा केंद्र

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.११, बुलडाणा : दहावी, बारावी परीक्षेत सामूहिक कॉपी करण्याचे प्रकार ज्या केंद्रावर उघडकीस येतील त्या केंद्राची मान्यता कायमस्वरूपी रद्द केली जावी. तसेच जे शिक्षक आणि कर्मचारी कॉपी करण्यासाठी मदत करतील त्यांना बडतर्फ करा, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिनांक ११ फेब्रुवारी २०२५ रोजी दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, पोलीस अधिकारी यांच्याशी परीक्षेच्या तयारी बाबत आणि कार्यवाही करण्याबाबत संवाद साधला. त्यावेळी त्यांनी हे आदेश दिले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मंत्री उपस्थित होते.तसेच बुलढाण्यातून प्र.जिल्हाधिकारी सदाशीव शेलार, उप मुख्य कार्यकारी अधिकारी बी.एम. मोहन, अपर पोलीस अधीक्षक बी.बी. महामुनी आदी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. इयत्ता बारावीची परीक्षा आजपासून १८ मार्चपर्यंत कालावधीत ३,३७३ परीक्षा केंद्रावर होणार आहे. दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च कालावधीत ५,१३० परीक्षा केंद्रावर होणार आहे. यासाठी सर्व तयारी पूर्ण केली असल्याचे माहिती शिक्षण विभागाकडून देण्यात आली.

कॉपीमुक्त परीक्षेची अंमलबजावणी

यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परीक्षा केंद्र परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १६३ ची कडक अंमलबजावणी करण्यात यावी, परीक्षा केंद्रावर व १०० मीटर परिसरात अनाधिकृत व्यक्तींना पूर्णत: प्रतिबंध करण्यात यावा, परीक्षा केंद्रात प्रवेश देतांना विद्यार्थी कोणत्याही प्रकारचे कॉपी करण्याचे साहित्य (पुस्तके, नोटस्, मोबाईल इ.) जवळ बाळगणार नाहीत याची खबरदारी घ्यावी , भरारी पथकाव्दारे कॉपी मुक्त परीक्षेची प्रभावी अंमलबजावणी अपेक्षीत आहे, अशा सूचना दिल्या.

विशेष बैठ्या पथकांची नियुक्ती होणार

सर्व परीक्षा केंद्रावर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत विशेष बैठ्या पथकाची नियुक्ती करण्यात यावी, बैठ्या पथकाने परिक्षा सुरु होण्यापूर्वी एक तास परिक्षा केंद्रावर पोहोचावे व परिक्षा संपल्यानंतर उत्तरपत्रिका कस्टोडियनकडे जमा करेपर्यंत नियंत्रण ठेवावे,संवेदनशील केंद्रांवर कार्यक्षम व वरिष्ठ अधिका-यांची बैठ्या पथकात नेमणूक करावी. असेही त्यांनी सांगितले.

संवेदनशील केंद्रावर ड्रोनची नजर

संवेदनशील परिक्षा केंद्रांवर ड्रोन कॅमेराव्दारे आणि व्हिडीओ कॅमेराव्दारे पूर्णवेळ निगराणी करावी, सर्व तालुक्यातील परिक्षा केंद्रांवर पुरेसा बंदोबस्त, बैठी पथके, ड्रोन व व्हिडीओ कॅमेरे कार्यरत असावेत यावर निगराणी ठेवण्याकरिता जिल्हाधिका-यांनी प्रत्येक तालुक्याकरिता एक विभाग-प्रमुख, उपजिल्हाधिकारी यांची नियुक्ती करावी, अशा सूचना दिल्या.

बुलडाण्यात बारावीच्या ३४,६३५ विद्यार्थ्यांची परीक्षा ; ११६ परीक्षा केंद्र

बुलडाण्यात बारावी परीक्षा आजपासून ते १८ मार्चपर्यंत होणार असून, ३४,६३५ विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली जात आहे. तर दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्चदरम्यान होणार असून, ४०,१९४ विद्यार्थी परीक्षेला बसणार आहेत. जिल्ह्यात बारावीचे ११६ व दहावीचे १५९ परीक्षा केंद्र आहेत. ही परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी एक जिल्हास्तरिय तर १३ तालुक्यात प्रत्येकी एक भरारी पथक नेमण्यात आले आहेत. तसेच कायदा व सुरक्षा व्यवस्थेदृष्टीने परीक्षा केंद्रांवर गस्त घालण्यासाठी पोलीसांचे ३३ पथक आणि जिल्हा परिषद यंत्रणेचे २३ पथक नेमले आहेत. या परीक्षांवर कडक लक्ष देण्यात येत आहे. परीक्षा केंद्रात विद्यार्थ्यांना शांततेत देता यावी यासाठी कॉपामुक्त अभियान राबविले जात आहे. केंद्रावर कॉपी पुरविणाऱ्या पालक, अधिकारी, कर्मचारी आणि शिक्षकांवर कारवाई केली जाणार आहे. मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानुसार बुलढाण्याच्या कॉपीमुक्त अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी केली जात असल्याचे प्र.जिल्हाधिकारी सदाशिव शेलार यांनी यावेळी सांगितले.

थोडक्यात

महाराष्ट्र तंत्रनिकेतन महाविद्यालयात 'परीक्षा पे चर्चा' कार्यक्रमाचे आयोजन संपन्न

अक्षराज : उमेश तबिब

दि.१०, दापोली (रत्नागिरी) : पंतप्रधान नरेंद्र मोदी देशभरातील विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांच्याशी दरवर्षी परीक्षा पे चर्चा कार्यक्रमाच्या माध्यमातून संवाद साधतात. या कार्यक्रमात पंतप्रधान मोदींसोबत विविध क्षेत्रातील सेलिब्रेटीही विद्यार्थ्यांशी संवाद साधतात. नुकताच हा कार्यक्रम दिल्लीतील भारत मंडपम येथे संपन्न झाला. त्या अनुषंगाने दळवी शैक्षणिक आणि चॅरिटेबल ट्रस्ट संचलित महाराष्ट्र तंत्रनिकेतन महाविद्यालयात 'परीक्षा पे चर्चा' हा कार्यक्रम दृक श्रव्य माध्यमातून आयोजित करण्यात आला. कार्यक्रमात पंतप्रधान मोदी विद्यार्थ्यांसोबत परीक्षेबद्दल आणि त्यांच्या शैक्षणिक अडचणी आणि इतर गोष्टींवर बोलले. तसेच या कार्यक्रमात विद्यार्थ्यांचे पालक आणि शिक्षक ही पंतप्रधानांशी संवाद साधला. आजच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांची सर्व स्वप्ने आणि उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी त्यांना मदत करण्यासाठी आणि सक्षम करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांशी संवाद साधला. महाविद्यालयात आयोजीत कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व समिती सदस्य मंडळ तसेच सर्व प्राध्यापक व सर्व शिक्षकेतर कर्मचारी एनएसएस स्वयंसेवकांनी मेहनत घेतली. कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक सर्व शिक्षकेतर कर्मचारी तसेच महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी संस्थेचे संचालक अजय दळवी, दळवी कॅम्पस हेड विशाल नटे आणि प्राचार्य अरुण ढंग याचे मोलाचे मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले.

हत्तीरोगापासून बचावासाठी गोळ्या खाल्ल्यात का ? - डॉ.अनमुलवाड

अक्षराज : दत्ता हमंद

दि.१०, कुंडलवाडी : एक मच्छर तुम्हाला आयुष्यभरासाठी अपंग बनवू शकतो. म्हणून दिनांक १० फेब्रुवारी २०२५ पासून ते २३ फेब्रुवारी पर्यंत आरोग्य कर्मचारी प्रत्यक्ष आपल्या घरी येऊन हत्ती रोगापासून बचावासाठी गोळ्या देतील. या गोळ्या प्रत्येकाने आरोग्य कर्मचाऱ्यांच्या समक्ष खाव्यात. या गोळ्या सरकारी आरोग्य केंद्रातकडून मोफत उपलब्ध आहेत. असे तालुका आरोग्य अधिकारी डॉ.गणपत वाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कर्तव्यदक्ष, रुग्णप्रेमी महिला वैद्यकीय अधिकारी डॉ.सारिका अनमुलवाड यांच्या नियोजनाखाली प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रातील सर्व आरोग्य अधिकारी, समुदाय अधिकारी तसेच आशा सेविका आदी ठिकठिकाणी घरोघरी खेडोपाडी जाऊन प्रत्येक व्यक्तींना या गोळ्या देणार आहेत कृपया त्यांनी या गोळ्यांचे सेवन करावे असे त्यांनी सांगितले. हत्तीरोग मच्छर चावल्याने पसरतो, याच्या संक्रमणामुळे हात-पाय आणि अंडकोषामध्ये अधिकची सूज येते. यामुळे अपंगत्व येऊ शकते. त्यासाठी सर्वांनी या हत्तीरोग दूरीकरण औषधी उपचार मोहिमेत सहभागी होऊन हत्तीरोग नाहीसा करण्यासाठी सक्रिय भाग घ्यावा. व या औषधांचे सेवन करावे. असे त्यांनी सांगितले. औषधांचे प्रत्यक्ष नागरिकांकडून सेवन करून घेत असताना कर्तव्यदक्ष आरोग्य सेविका व्हि. जी.देवकांबळे व पि.एम.गायकवाड स्वयंसेवक टिपलेले छायाचित्र.

शालेय शिक्षण राज्यमंत्री भोयर यांनी केली परीक्षा केंद्राची पाहणी

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.११, बुलडाणा : इयत्ता बारावीची परीक्षा सुरु झाली असून राज्याचे शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांना मंगळवार, दिनांक ११ फेब्रुवारी २०२५ रोजी बुलडाणा जिल्ह्याच्या दौऱ्यावर असतांना शेगाव येथील श्री ज्ञानेश्वर मस्कुजी बुरुंगले कला व विज्ञान कनिष्ट महाविद्यालयाच्या परीक्षा केंद्राला भेट देऊन परीक्षा प्रक्रियेची पाहणी केली. या भेटीच्या वेळी भारतीय संस्कृतीप्रमाणे प्राचार्या मीनाक्षीताई बुरूंगले व पर्यवेक्षक शिवाजी निळे यांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे सत्कार केले. यावेळी आशिष वाघ उपशिक्षणाधिकारी(मा), अनिल देवकर, उपशिक्षणाधिकारी (प्रा),गटशिक्षणाधिकारी श्रद्धा वायदंडे, योगीराज फाउंडेशनचे सचिव डॉ. श्यामकुमार बुरूंगले, श्रीधर पाटील आणि सोबत इतर अधिकारी, पत्रकार, प्राध्यापक व शिक्षक उपस्थित होते. आजपासून इयत्ता बारावीची परीक्षा सुरु झाली असून राज्यभरात कॉपीमुक्त अभियान राबविण्यात येत आहे. यादृष्टीने परीक्षा केंद्रांवर कॉपीमुक्त परीक्षा राबविली जात आहे का याची पाहणी करण्यासाठी राज्यमंत्री पंकज भोयर यांनी ही भेट दिली. या पाहणी दरम्यान त्यांनी राज्यात आजपासून सुरू झालेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षा व कॉपीमुक्त अभियानासंदर्भात माहिती दिली. याशिवाय विद्यार्थ्यांनी शांततेत परीक्षा द्यावी. तसेच परीक्षा केंद्रातील अधिकारी, कर्मचारी, शिक्षक आणि पालकांनी कॉपीमुक्त अभियात सहभागी होवून सहकार्य करण्याचे आवाहन केले.

केएलई महाविद्यालयात हवामान बदल साक्षरता कार्यक्रमाचे आयोजन

अक्षराज : जे. के. पोळ

दि.१०, पनवेल : माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत पर्यावरण संवर्धन व संरक्षण याचे महत्व शालेय स्तरावर, महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थ्यांमध्ये प्रत्यक्ष कृतीद्वारे बिंबवण्यासाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये, महाविद्यालयामध्ये 'पर्यावरण तास' हा उपक्रम पनवेल महानगर पालिकेच्या वतीने राबविण्यात येत आहे. या अंतर्गत आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी दिनांक ०६ फेब्रुवारी रोजी केएलई महाविद्यालयात 'हवामान बदल साक्षरता' कार्यक्रम घेण्यात आला.

माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत पर्यावरणाचे महत्व शालेय विद्यार्थ्यांना समजावे यासाठी पर्यावरण तास हा उपक्रम उपायुक्त डॉ.वैभव विधाते यांच्या सूचनेनुसार महापालिका कार्यक्षेत्रातील महाविद्यालामध्ये, विद्यालयांमध्ये राबविण्यात येत आहे. या अंतर्गत आकाश, जल, वायू, भूमी, अग्नि या माझी वसुंधरा अभियानातील महत्वाच्या घटकांनूसार कृती कार्यक्रम, शिबिरे, व्याख्याने, वक्तृत्व स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, वृक्षारोपण, प्रश्नमंजूषा, चर्चासत्र, गटचर्चा, तसेच विविध खेळांचे आयोजन करण्यात येत आहे.